तात्काळ प्रथम प्राधान्य

क्र/शिष्य/१७-१८/डीबीटी/योजना/२२४
शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक),
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१. दिनांक २३/१०/२०१८.

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)

विषय : डीबीटी पोर्टलवर सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी माहिती भरणेबाबत

संदर्भ : १) शालेय शिक्षण व युवक सेवा विभाग शासन निर्णय क्र.एचएससी १०७६ /४१९/वीस-एकवीस दि.६/५/१९७६
२) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.एफईडी १०८४/(२५६८)/साशि-५ दि.६/२/१९८७
३) शासन पत्र क्र.डीबीटी-२०१७/प्र.क्र.२२/एसडी-५ दि.२२/१०/२०१८

शालेय शिक्षण विभाग, सामाजिक न्याय विभाग, विमुक्त जाती, भटक्या जमाती , इतर मागासवर्ग व विमाप्र कल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग या विभागांच्या योजना महाडीबीटी www.mahadbtmahait.gov.in पोर्टलवर घेण्यात आल्या आहेत.

सद्यस्थितीत डीबीटी पोर्टल संपूर्ण महाराष्ट्रात कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. महाराष्ट्रातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयाची नावे पोर्टल वर घेण्यात आली आहेत.

१. सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांचे Institute profile /courses बाबतची माहिती आवश्यक कागदपत्र पोर्टल वर अपडेट करावयाची आहेत. कॉलेजचे युजर आयडी व पासवर्ड कॉलेजच्या ई मेल आयडी वर पाठविण्यात आलेले आहेत तथापि excel sheet विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाना ई मेल व्दारे पाठविण्यात आलेले आहेत. ज्या कॉलेजची नावे पोर्टल वर दिसत नाही अशा महाविद्यालयाने त्यांचा युडाएस क्रमांक विभागस्तरावर नेमणूक दिलेल्या डीबीटीच्या तंत्रसल्ल्लागार यांना देवून आपला युजर आयडी व पासवर्ड उपलब्ध करुन घ्यावा.

२. कनिष्ठ महाविद्यालयांनी डीबीटी पोर्टल वरील विविध वित्तीय लाभाच्या योजनांची माहिती सर्व विद्यार्थ्यांना द्यावी व त्याबाबत मार्गदर्शन करावे.

३. कनिष्ठ महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी डीबीटी पोर्टलवर डीबीटी पोर्टलच्या माहिती संबंधित व्हिडीओ पहावेत.तसेच पोर्टलवर अडचणी उद्भवल्यास online grivence वर त्याबाबत नोंद करावी.

४. शालेय शिक्षण विभागांतर्गत असलेली कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील गुणवत्ता शिष्यवृत्ती व ज्युनिअर कॉलेज साठी खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती या योजनेचा समावेश Maha DBT Portal वर आहे. ज्या विद्यार्थ्यांनी हया शिष्यवृत्तीचा लाभ सन २०१७-१८ मध्ये घेतलेला आहे, त्या विद्यार्थ्यांना या वर्षी देय असलेली शिष्यवृत्ती डी.बी.टी पोर्टलवर ऑनलाईन प्रॉफाईल तयार करण्याच्या सुचना देण्यात याव्यात.

(गंगाधर म्हमाणे)
शिक्षण संचालक
माध्यमिक व उच्च माध्यमिक

प्रत : १) मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
२) नेहा हुमरसकर, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.